# प्रतिवाद



## जावे धूरमुक्त गावा

काही गावांची ओळख ही त्यांची कायमची होऊन जाते. अगदी त्याच पध्दतीने फलटण तालुक्यातील नांदल आणि सुरवडी या दोन गावांची ओळखही 'धूरमुक्त गाव' म्हणून होत आली आहे. 'किर्लोस्कर कमिन्स', 'आरती'चे संस्थापक डॉ. आनंद कर्वे, अध्यक्ष आर. डी. हणबर-देशमुख आणि 'समुचित'च्या सर्वेसर्वा डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांनी ही किमया साध्य केली. या कामी सुरवडी आणि नांदल ग्रामस्थांचे योगदान आणि सहभागही तितकाच मोलाचा आहे. या दोन गावांनी दाखविलेली कल्पक्ता आणि सकारात्मक विचार हा पर्यावरण संतुलनाकडे वाटचाल करणारा असल्यामुळेच ते साध्य झाले. त्याचे कारणही तसेच आहे. या दोन गावांचा संशोधनात्मक पातळीवर जाऊन अभ्यास केला तर शंभर टक्के सकारात्मक पर्याय संपूर्ण महाराष्ट्रापुढे उभा राहणार आहे, त्यासाठी हे उदाहरण खूप बोलके आहे. महाराष्ट्रात रोज दोन कोटीहून अधिक चुली पेटवल्या जात असताना त्यापाठीमागचे अर्थकारण आणि पर्यावरणाचे होणारे नुकसान लक्षात घ्यायला हवे. प्रत्येक घरात एका चुलीसाठी सरासरी पाच किलो लाकडे धरली तर रोज दहा कोटी किलो लाकडे जाळली जात असल्याचे पुढे आले आहे. मात्र त्या तुलनेत निर्मिती होत नाही, हा भाग वेगळा आहे. एक किलो लाकडाची किमंत सात रुपये गृहीत धरली आणि महाराष्ट्रात रोज जेवणासाठी चुलीत जळणारी दहा कोटी किलो लाकडे याचा उहापोह केला तर रोजची रक्कम ही सत्तर कोटी इतकी होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या २००२ चा अहवाल तर त्याच्या पुढची माहिती देतो. देशात दरवर्षी चुलीतून बाहेर पडणाऱ्या धुरांने पाच लाख महिला आणि बालके मृत्यूमुखी पडतात. महाराष्ट्रातही हा आकडा हजारांच्या घरात असण्याची शक्यता नाकारता येत नाही, फक्त त्यासाठी अभ्यासाची आवश्यकता आहे. नांदल आणि सुरवडी येथे 'समुचित एन्व्हायरो टेक'च्या डॉ. प्रियदर्शनी कर्वे यांनी विकसित केलेल्या 'भारतलक्ष्मी' निर्धूर चुलीचा प्रयोग लक्षवेधी ठरतो कारण 'आरती' संस्थेतील संशोधकांच्या मते दोन्ही गावातील महिलांच्या आरोग्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात कमी झाला. साहजिकच घराअंतर्गत असणारे प्रदूषणही तर कमी झालेच आणि त्याच्याजोडीला परिसरातही त्याचा फायदा झाला. परिणामी किर्लोस्कर कमिन्सने 'आरती'च्या कार्याची दखल घेतली आणि पाच लाख रुपयांचा पुरस्कार देऊन गौरव केला. फलटण तालुक्यात धूरमुक्त गावांची ही प्रक्रिया सुरू असतानाच आसगाव, ता. सातारा आणि वाळंजवाडी, ता. जावळी या गावांनीही 'बायोगॅस'चा स्वीकार करत चूल कायमची नष्ट केली. गाव धूरमुक्त होण्याचा मोठा फायदा महिलांना होत आहे. चुलीशी रोजचा संपर्क महिलांचा असतो, परिणामी आरोग्य समस्येचा सामना करावा लागायचा. सातारा जिल्ह्यातील कितीतरी गावांनी आता बायोगॅसचा स्वीकार केला आहे. जिल्ह्यातील कितीतरी गावांत धूरमुक्त गावांमुळे हजारो महिलांच्या जीवनमानात क्रांती केली आहे. यांचे संपूर्ण श्रेय अर्थातच 'आरती' आणि 'बायोगॅस'ला जाते.

**- मोहन मस्कर-पाटील**